P.S.R.S.P.M.T.

Matoshri Shantabai Gote Arts,Commerce & Science College Washim

(NAAC ACCREDITED WITH 'B'GRADE)

Department Of Library Science

Activities

Name of Activities

Year :- 2021 - 2022

Department Of Library Science

ग्रंथालय दिवस साजरा

Date : 12/08/2024

डॉ. एस.आर रंगनाथन जयंती

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने ग्रंथालय दिवस साजरा करण्यात आला आहे 12 ऑगस्ट रोजी

ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची 129 वी जयंती साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आले आहे

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. न. जे. गोटे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून रत्नदीप पिंपळकर होते तसेच प्रमुख उपस्थित होते महाविद्यालयाचे प्राचार्य जी.एस. कुलवाडे हे उपस्थित होते

कार्यक्रमाचे प्रास्ताविक Bonde R.G. यांनी केले डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवनावर व ग्रंथालय माहितीशास्त्रावर माहिती दिली उपस्थितीचे कार्यक्रमाचे आभार Dr.P.J.Gore यांनी मानले कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे उपस्थिती होती.



लोकमत

epaper.lokmat.com
अकोला, शुक्रवार, दि. १३ ऑगस्ट २०२१

गोटे महाविद्यालयात ग्रंथालय विभागाकडून ग्रंथालय दिवस साजरा

लोकमत न्यूज नेटवर्क

वाशिम : मातोश्री शांताबाई गोटे कनिष्ठ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम या महाविद्यालयातील ग्रंथालयातील विभागाकडून १२ ऑगस्ट रोजी गुरुवारी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांची १२९ वी जयंती साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संदीप पिंपळकर हे होते. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्रचार्य डॉ. जी.एस. कुबडे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. आर. जी. बोडे यांनी केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. नारायणराव गोटे यांनी डॉ.एस. आर. रंगनाथन यंनी आयुष्यभर ग्रंथालयाच्या विकासासाठी अपार मेहनत घेतली. मद्रास विद्यापीठाचे ग्रंथपाल म्हणून त्यांनी काम केले असून, डॉ. रंगनाथन यांचा व्यक्तिमत्व अष्टपैलू असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. विकास वाहेकर यांनी केले. तर उपस्थितांचे आभार डॉ. पांडुरंग गोटे यांनी मानले. कार्यक्रमाला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

वाचन प्रेरणा दिन साजरा

Date :- 15 / 10/ 2021

डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती

मातोश्री शांताबाई गोटे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय वाशिम येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला आहे दिनांक 15 ऑक्टोंबर या दिवशी

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ. पी. जे. गोटे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून समीर गोटे सर यांची उपस्थिती होती

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली डॉ. तनपुरे यांनी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या विषयी वाचन प्रणाली साजरा करण्याचा उद्देश यांच्या मार्गदर्शन केले आहे.

व तसेच उपस्थितीचे आभार ग्रंथालय व Bonde Sir यांनी मानले याप्रसंगी शिक्षक व शिक्षक तर विद्यार्थी उपस्थित होती.



गोटे महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

देशोन्नती वृत्तसंकलन...

वाशिम ■ मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिनाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना पथक व ग्रंथालय विभागाच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाइन पद्धतीने हा दिन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.पांडुरंग गोटे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून सुमित गोटे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.बी.आर. तनपुरे यांनी केले. त्यात त्यांनी डॉ. कलाम हे भारताचे ११ वे राष्ट्रपती होते. भारताच्या आण्विकीच्या प्रक्षेपणास्त्राच्या निर्मितीत त्यांचा सिंहाचा वाटा असल्याचे सांगितले. त्यांना भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान असलेला भारतरत्न देऊन सन्मानित करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. सुमित गोटे यांनी आपल्या मार्गदर्शनात अब्दुल कलाम यांना वाचनाचा व्यासंग असल्याचे सांगून त्यामुळेच त्यांचा जन्मदिवस हा 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा केला जात असल्याचे सांगितले. त्यांच्या ठिकाणी असलेल्या हाच गुण विद्यार्थ्यांनी अंगी बणवावा म्हणून हा दिवस साजरा करण्यात येत असल्याचे सांगितले. डॉ. पांडुरंग गोटे यांनी आपल्या मार्गदर्शनात डॉ. कलाम हे इस्त्रोचे वैज्ञानिक होते ते भारताच्या अंतराळ कार्यक्रम आणि क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमात सहभागी असल्याचे सांगितले. तसेच ते मिसाईल मॅन म्हणूनही ओळखले जात असल्याचे सांगितले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून यासाठी ऑनलाईन पद्धतीने पुस्तक वाचन कार्यक्रम राबविण्यात आला होता. या कार्यक्रमात मयूरा तोटावार, श्रीकृष्णा वाघमारे, कु. शहानावी आदी विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

विद्यार्थ्यांकडून अग्नीपंख, महात्मा जोतीराव फुले, सत्याचे प्रयोग आदी पुस्तकांचे वाचन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे संचालन डॉ. खो.बी. खाडदवे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार ग्रंथालय विभाग प्रमुख डॉ. राजकुमार बोडे यांनी मानले. या ऑनलाईन शिबिरास शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. (वा.प्र.)

देशोन्नती

वाशिम, मंगळवार, दि. २६ ऑक्टोबर २०२१

३